कार्यालय नगरपंचायत हिंगणा
ता. हिंगणा, जि. नागपुर

Email :- nphingna@gmail.com

क्रमांक / नपंहि जा.क्र. -1470 / 2022 दिनांक -30 / 8 / 2022

परिशिष्ट डी-१
बांधकाम परवानगी मंजुरी व प्रारंभ प्रमाणपत्र
(प्लींथ लेव्हलपर्यंत)

प्रति,
श्री. अजय प्यारेलाल पारधी व इतर २
रा. हिंगणा

विषय:- निवासी वापराचे सदनिका बांधकाम व वाणिज्य वापराचे इमारत बांधकामास परवानगी बाबत.

संदर्भ:- आपला बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्ज दिनांक २९/११/२०२१

आपले संदर्भांकित बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्ज क्र २९५० दिनांक २९/११/२०२१ अन्वये आपण महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नागरी अधिनियम १९६५ चे कमल १८९ अन्वये अर्ज सादर केला आहे. उपरोक्त अर्जाचे अनुषंगाने हिंगणा नगर पंचायत हद्दितील प्रभाग/वार्ड नाव/क्रमांक १७ खसरा नं. २२४ व ३८२,भुखंड क्र./ चालता/नगर भुमापन क्रमांक - १ व २, एकुण क्षेत्रफळ = १८१५.०० चौ.मी. मधील जागेवर वाणिज्य वापराचे तळमजला - ११२.७४८ चौ.मी व पहिला मजला ते सहावा मजला - ३६०७.९०४ चौ. मी, सातवा मजला - ३४४.५०९ चौ.मी. एकुण बांधकाम क्षेत्रफळ - ४०६५.१६१ चौ.मी. निवासी वापराचे सदनिका बांधकाम व वाणिज्य वापराचे इमारत बांधकाम 'प्लींथ लेव्हल पर्यंत (जोता बांधकाम)' बांधकाम करण्यास महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये प्रारंभ प्रमाणपत्र खालील अटी व शर्तीनुसार देण्यात येत आहे.

१. या प्रारंभ प्रमाणपत्रानुसार प्रस्तावीत इमारतीचे बांधकाम फक्त 'प्लींथ लेव्हलपर्यंत' (जोता बांधकाम) करण्यास परवानगी देण्यात येत आहे. मंजुर बांधकाम परवानगी नकाशाप्रमाणे प्लींथ लेव्हल पर्यंत बांधकाम पुर्ण झाल्यानंतर सदर इमारतीचे सुपरविजन (देखरेख) करणाऱ्या लायसन्स इंजीनिअर यांनी परिशिष्ट एफ मधील नमुन्यात त्याबाबतची सुचना नगर पंचायतला द्यावी लागेल. त्यानंतर नगर पंचायत व्दारा प्रत्यक्ष बांधकामाची पाहणी करुन झालेले बांधकाम,

परवानगी प्रमाणे निदर्शनास आल्यानंतर पुढील बांधकामाकरीता विहीत नमुन्यामध्ये बांधकाम परवानगी देण्यात येईल.

२. बांधकामास लागणारे साहीत्य स्वत:च्या जबाबदारीवर व स्वत:चे जागेवर ठेवावे लागेल.

३. बांधकाम परवानगी मंजुरी तारखेपासून १ (एक) वर्षाकरिता ग्राहय राहील व त्यास तीन वेळा मुदतवाढ देण्यात येईल. मुदतीच्या आत बांधकाम सुरु करुन पूर्ण करणे शक्य नसल्यास मुदतीच्या आत मुदतवाढीसाठी एक महिण्यापुर्वी अर्ज करुन परवानगी घ्यावी लागेल.

४. बांधकाम साहित्य रस्ते, गटारे, सार्वजनिक उपयोगाच्या व राहदारीच्या जागेवर ठेवता येणार नाही. राहदारीच्या जागेवर वा गटारावर बांधकाम साहित्य टाकल्यास पुर्व सुचना न देता महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नागरी अधिनियम १९६५ चे कलम १७९ अन्वये कार्यवाही करुन हटविण्यात येईल.

५. मंजुर नकाशाप्रमाणे बांधकाम करणे बंधनकारक आहे. तसे करीत नसल्याचे आढळल्यास महाराष्ट्र प्रादेशीक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५२,५३,५४ तसेच महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायत व औद्योगीक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

६. कोणत्याही स्वरूपाचा वाद निर्माण झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील. आपल हक्क संबंध पाहुन बांधकाम करावे.

७. वेळोवेळी शासनाकडुन ज्या अटी व शर्ती लागू होतील त्या आपणास बंधनकारक राहील.

८. बांधकामास सुरूवात करतेवेळी कमीम कमी ४ वृक्ष लावणे आपणावर बंधनकारक राहील. प्लींथ लेवलनंतर पुढील बांधकाम परवानगी देते वेळी परील अटीची पुर्तता तपासण्यात येईल.

९. बांधकाम हाती घेण्यापुर्वी अधिकृत स्ट्रक्चरल डिझाईनर कडुन स्ट्रक्चरल डिझाईन तसार करवुन घ्यावे व त्याची एक प्रत नगर पंचायत कार्यालयास सादर करावी.

१०. इमारतीचे डिझाईन भारतीय मानक ब्युरो ने भुकंप रोधक बांधकामाचे संदर्भात विहीत केलेल्या तरतुदीनुसार पुर्तता करण्याची जबाबदारी आपली आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना/नैसर्गीक आपत्ती झाल्यास होणाऱ्या नुकसानास आपण जबाबदार राहाल.

११. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. टिपीबी-४३१२/युओआर २५९/नवि-११/दिनांक १०/०१/२०१२ अन्वये इमारत व बांधकाम व्यवसायातील कामगार यांचे संदर्भात कामगार विभागाने निर्गमीत केलेले नियम/परिपत्रक/प्रचलीत आदेश याची पुर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी मालकाची आहे. यात अनियमितता आढळल्यास होणाऱ्या कार्यवाहीस आपण मालक जबाबदार राहाल.

१२. इमारतीचे बांधकामस सार्वजनिक बांधकाम विभागाचे स्पेशिफीकेशन प्रमाणे करण्याची जबाबदारी आपली राहील.

१३. उक्त भुमापन क्र. २२४ चे अभिन्यासमधिल बांधकाम प्रस्तावित असलेले भुखंड क्र. १ व २ एकुण क्षेत्रफळ १८१५.०० चौ. मि. जागेवरील गार्डन चे आरक्षण नियोजन समितीकडुन काढुन घेण्यात येवुन सदर जागा वाणिज्य वापर प्रयोजनार्थ करण्यात आली आहे.व फेरबदलाबाबतच्या प्रस्ताव म.प्रा.व नगररचना अधिनियम १९६६ चे कलत २४(४) अन्वये प्रसिध्दीकरण करण्यात येवुन शासनाकडे मंजुरीकरीता सादर करण्यात आले आहे. सदर परवानगी नियोजन समितीकडुन मंजुर फेरबदलास शासनाकडुन अंतिम मंजुरी प्राप्तीचे अधिन राहुन देण्यात येत आहे.

सहपत्र:- प्लींथ लेव्हल पावेतो बांधकाम मंजुरी
नकाशा-१

नगर पंचायत हिंगणा

(राहूल परिहार)
मुख्याधिकारी
नगरपंचायत हिंगणा